हवाई अंतर प्रमाणपत्र प्राप्त कारखान्यांनी ऊस गाळप परवाना घेताना भारतीय सर्व्हेक्षण विभागाकडून चिमणी उभारलेल्या जागेचे अक्षांश व रेखांश यांची मोजणी करणेबाबत.

# परिपत्रक

शुगर केन कंट्रोल ऑर्डर १९६६ (सुधारणा २००६) मधील कलम ६ (ब) क अन्वये साखर आयुक्त यांना नवीन प्रस्तावित साखर कारखान्यांस हवाई अंतर प्रमाणपत्र देण्याबाबत प्राधिकृत केलेले आहे. शुगर केन कंट्रोल ऑर्डर १९६६ (सुधारणा २००६) कलम ६ (अ) मध्ये दोन साखर कारखान्यांमधील अंतर १५ कि.मी.असावे अशी तरतूद होती. त्यानंतर महाराष्ट्र शासनाने दिनांक ०३.१२.२०११ रोजी प्रसिध्द केलेल्या राजपत्रानुसार दोन साखर कारखान्यांमधील किमान हवाई अंतर २५ कि.मी.असावे अशी तरतूद आहे.

साखर आयुक्त कार्यालयाकडून खाजगी कारखान्यांनी हवाई अंतर प्रमाणपत्र प्राप्त करुन घेतलेले आहे. सदरचे हवाई अंतर प्रमाणपत्र हे संबंधीत कारखान्यांनी भारतीय सर्व्हेक्षण विभाग यांचेकडून दाखल केलेल्या हवाई अंतर मोजणीपत्रानुसार तसेच शुगर केन कंट्रोल ऑर्डर १९६६ (सुधारणा २००६) व महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक ०३.१२.२०१२ मधील तरतूदीनुसार दिलेले आहे.

हवाई अंतर प्रमाणपत्र प्राप्त केल्यानंतर कारखान्याने एक महिन्याचे आत आय.ई.एम. प्राप्त करणे बंधनकारक आहे. आय.ई.एम. घेतलेपासून ३० दिवसाचे आत मा.मुख्य संचालक (साखर) यांचेकडे रु.१ कोटी परफॉर्मन्स बँक गॅरंटी भरावयाची आहे. आय.ई.एम.घेतल्यापासून दोन वर्षाचे आत इफेक्टिव्ह स्टेप्स घ्यावयाच्या आहेत. तसेच आय.ई.एम.घेतलेपासून चार वर्षाचे आत सदर कारखान्याने गाळप हंगाम घ्यावयाचा आहे. सदर बाबतच्या सर्व तरतूदी शुगर केन कंट्रोल ऑर्डर १९६६ (सुधारणा २००६) मधील कलम ६(ब), ६(क), ६(ड) व ६(इ) मध्ये नमूद केलेल्या आहेत. उपरोक्त विहीत मुदतीत गाळप चालू न केल्यास सदरची मुदत मा.साखर संचालक (साखर), नवी दिल्ली यांचेकडून वाढवून मिळाले असलेबाबतची कागदपत्रे ऊस गाळप परवाना घेतेवेळी सोबत दाखल करणे आवश्यक आहे.

साखर आयुक्त यांनी कारखान्यास हवाई अंतर प्रमाणपत्र देताना भारतीय सर्वेक्षण विभाग यांनी दिलेले मोजणीपत्र तसेच अर्जदार यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांनुसार ज्या गट नंबरसाठी हवाई अंतर प्रमाणपत्र दिलेले आहे, त्याच गट नंबरमध्ये त्या अक्षांश व रेखांश यावर कारखान्याची चिमणी उभारणे आवश्यक आहे. तथापि, काही खाजगी कारखाने त्याच गटामध्ये चिमणीची उभारणी न करता ती इतरत्र करीत असल्याने हवाई अंतर प्रमाणपत्र देताना अर्जदाराने इतर कारखान्यांपासून दर्शविलेले अंतर कमी जास्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही आणि अशा परिस्थितीत शुगर केन कंट्रोल ऑर्डर १९६६ (सुधारणा २००६) मधील हवाई अंतराच्या तरतूदींचा भंग होण्याची शक्यता आहे. कारखान्याने प्रस्तावात नमुद केलेल्या पॉईंटवर चिमणी उभारणे आवश्यक आहे.

हवाई अंतर प्रमाणपत्र प्राप्त करुन घेतलेले जे कारखाने प्रथम गाळप हंगाम घेणार आहेत त्या कारखान्यांसाठी चिमणीची उभारणी ज्या जागेवर केलेली आहे त्या जागेचे अक्षांश व रेखांश भारतीय सर्व्हेक्षण विभागाकडून मोजून घेणे आवश्यक असून सदरचे अक्षांश व रेखांश हे हवाई अंतर प्रमाणपत्र घेतेवेळी असलेल्या अक्षांश व रेखांशाची जुळणे बंधनकारक आहे अथवा हवाई अंतर प्रमाणपत्र सर्व्हे ऑफ इंडियाच्या पत्रात नमूद केलेल्या ज्या गट नंबर/सर्व्हे नंबर/स्थळासाठी दिले आहे, त्याच जागेवर उभारणी केलेल्या चिमणीपासून त्या हवाई अंतर प्रमाणपत्रात नमूद केलेल्या सर्व संबंधित साखर कारखान्यांचे हवाई अंतर हे हवाई अंतर प्रमाणपत्र निर्गमित केल्याचेवेळी असणाऱ्या कायद्यातील तरतूदीनुसार असणे बंधनकारक आहे. सदर साखर कारखान्यांचे हवाई अंतर कायद्यातील तरतूदीपेक्षा कमी असल्यास सदरहू कारखान्यास ऊस गाळप परवाना देता येणार नाही व त्याची सर्वस्वी जबाबदारी कारखान्याचीच राहील याची नोंद घ्यावी.

( विजय सिंघल )
साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे.

जा.क्र.साआ/विकास/कक्ष-१०/ऊ.गा.प./९२८९/२०१२
साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-५.
दिनांक : १८ सप्टेंबर, २०१२.

प्रत,

१) मा.मुख्य साखर संचालक (साखर), नवी दिल्ली.

२) प्रादेशिक सहसंचालक (साखर) (सर्व)

३) सर्व संबंधित साखर कारखाने.